श्री. जीवन रघुनाथ बुंदे, अधिक्षक कृषि
अधिकारी यांच्या बदलीबाबत.

महाराष्ट्रशासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्रमांकः आकृवि १०१९/प्र.क्र.६७/१५अे
मंत्रालय विस्तार इमारत,
मंत्रालय, मुंबई -३२.
तारीख: ०३ जुलै, २०१९.

<u>वाचा</u>:- सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्र. कृपमं १०१८/प्र.क्र.१८१/२१-स, दि. २४.१२.२०१८.

<u>प्रस्तावना:-</u>

श्री. जीवन रघुनाथ बुंदे हे कृषि व्यवसाय विशेषज्ञ, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प, महाराष्ट्र राज्य, कृषि व पणन मंडळ, पुणे या पदावर कार्यरत होते. सदर प्रकल्पाचे कामकाज संपुष्टात आल्यामुळे श्री. बुंदे, कृषि व्यवसाय विशेषज्ञ (अधिक्षक कृषि अधिकारी) यांना प्रकल्प संचालक, महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प यांनी दि. २८.०२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये कार्यमूक्त केलेले आहे. त्यामुळे श्री. बुंदे हे दि. ०१.०३.२०१९ पासून पदस्थापनेच्या प्रतिक्षेमध्ये होते.

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(४) (दोन) व ४ (५) मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने विभागातील श्री. जीवन रघुनाथ बुंदे, अधिक्षक कृषि अधिकारी यांची खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र. ३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे बदलीने पदस्थापना करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिका-याचे नांव व पदनाम	सुधारित पदस्थापना
१	२	४
१	श्री. जीवन रघुनाथ बुंदे, अधिक्षक कृषि अधिकारी	प्रकल्प व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, पुणे

२. श्री. बुंदे यांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजु व्हावे व तसा अहवाल आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

३. श्री. जीवन रघुनाथ बुंदे, अधिक्षक कृषि अधिकारी, यांचा दि.०१ मार्च, २०१९ ते दि. ०२ जुलै, २०१९ हा बंधनात्मक प्रतिक्षाधिन कालावधी, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ९ (१४) (एफ) मधील तरतुदीनुसार कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करण्यात येत आहे.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०३१३१५०३०७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sugriv Sambhaji Dhapate

Digitally signed by Sugriv Sambhaji Dhapate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, serialNumber=fc102de27dc1b41e747ac6cbb491c4209459c3cf340720ea98fd1d95b19c9f65, cn=Sugriv Sambhaji Dhapate
Date: 2019.07.03 13:24:06 +05'30'

(सु. सं. धपाटे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)

प्रत,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.प्रधान सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) ½, महाराष्ट्र मुंबई/ नागपूर.
५. संबंधित विभागीय कृषि सह संचालक/जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
६. कृषि सह संचालक(आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
७. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
८. सर्व संबंधित अधिकारी (व्दारा आयुक्त (कृषि) पुणे)
९. निवड नस्ती /१५अे